संस्थेचे नाव: श्री मावळी मंडळ, ठाणे
स्थापना: दि. १ ऑगस्ट १९२५

**संस्थेची माहिती**

दिनांक १ ऑगस्ट १९२५ साली म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या श्री मावळी मंडळ ह्या संस्थेला ९९ वर्षाचा प्रदिर्घ इतिहास आहे. हा नव्यान्नव वर्षांचा कालखंड आपल्याला चार टप्प्यात विभागता येईल. :-

**<u>पहिला टप्पा (१९२५ ते १९५०)</u>**

हा काळ पारतंत्र्याचा विरोधातील लढ्याचा होता. प्रत्येकजण आपापल्या कुवतीनुसार इंग्रजी साम्राज्याला विरोध करीत होता. अशाच प्रकारच्या वेडोन झपाटलेले दोन तरूण होते, शंकर नारायण यादव व शंकर पुरूषोत्तम भोईर. हे दोन ध्येय वेडे तरूण एकत्र आले व त्यांनी आपल्यासारख्याच समान ध्येयाने झपाटलेल्या इतर तरूणांना एकत्र केले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या राष्ट्रपुरूषाबद्दल असलेल्या नितांत आदराची पावती म्हणून त्यांच्याच पुण्यतिथिचा दिवस स्थापनेकरीता निवडण्यात आला. तेव्हा देशात स्वातंत्र्याची चळवळ जोर धरू लागली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा आदर्श ठेवून ह्या स्वातंत्र्य लढ्यात आपणही मावळ्यांचे काम करावे हा उदात्त हेतू मनात होता व म्हणूनच मावळी मेळा संघटनेची स्थापना करून लोंकांना पारतंत्र्याविरुद्ध लढा देण्यासाठी एकत्रित करण्याचा या ध्येयवेड्या मंडळींनी जनजागरणाचा प्रयत्न केला. ह्या मेळयातून ऐतिहासिक वीर पुरूषांचे पोवाडे, छोटी प्रहसने आदी कार्यक्रम सादर करण्यात येऊ लागले.

तसेच, बलदंड तरूण पिढी तयार करण्यासाठी संस्थेने १९२६ सालात व्यायामशाळा सुरू केली. या व्यायामशाळेत व्यायामावरोवरच लाठी काठी चालवणे, दांडपटटा चालवणे, भालाफेक आदी शस्त्रकलेचेही शिक्षण दिले जाऊ लागले. मैदानी खेळ सुरू करण्यात आले. हुतुतू आट्यापाट्या विटीदांडू लगो-या हे तेव्हा समाजातील आवडीचे खेळ होते. त्यांचा वापर करून लोकांना एकत्रित केले जावू लागले. त्यांना संघटित रूप देण्यात आले. अशा प्रकारे संस्थेच्या मूळ संस्थापकांनी आपल्याभोवती अतिशय कौशल्याने कार्यकर्त्यांचे एक मोहोळ निर्माण केले.

१९३६ सालापर्यंत मंडळाच्या कार्याचा जोर वाढतच चालला होता. कार्यकर्ते तयार होत होते. मात्र संस्थेला एक कायमस्वरूपी असे स्वतःच्या मालकीचे ठिकाण नव्हते. हि सल कार्यकर्त्यांच्या मनाला सारखी बोचत होती. त्यामुळे स्वतःच्या जागेतच व्यायामशाळा सुरू करण्याचा त्यांनी निर्धार केला. पण ह्या कामासाठी पैसांची कमतरता होती. सगळे कार्यकर्ते हे सामान्य आर्थिक परिस्थितीलच होते. कोणी मिल मजूर, रेल्वे मजूर, कारागीर, पोस्टमन असेच होते . स्वतःच्या मालकीची जागा विकत घेणे हि एक दुरापास्त गोष्ट होती. कारण त्या कोणत्याही सावकाराचे शेठचे, व्यापाऱ्याचे कोणत्याही प्रकारे सहकार्य यांना नव्हते. कारण पारतंत्र्याच्या काळात जनजागृतीचे कार्य करणे म्हणजे द्रोह होता. तरीसुध्दा हे कार्यकर्ते डगमगले नाहीत.

१९४० च्या दशकातील हि गोष्ट होती. त्यांनी एक पंचवार्षिक योजना आखली. प्रत्येक सभासदाने शंभर रूपये संस्थेत जमा करायचे असे ठरवले. तेव्हा रूपयालाही फार मोल होते. कारण कनिष्ठ कामगारांना तेव्हा मासिक वेतन मिळत असे दहा रूपये एक रकमी शंभर रूपये या सदस्यापैकी अनेकांनी पाहिले देखील नव्हते. तरीसुध्दा या ध्येयवेड्या तरूणांनी हे आव्हान स्वीकारले. चार वर्षात प्रत्येकाच्या नावावर १०० रूपये जमा होण्यासाठी प्रत्येकाने दरमहा किमान दोन रूपये जमा करण्याचे ठरले. १९४३ ते १९४७ या कालावधीत मंडळाकडे दैनंदिन खर्च वजा जाता चार हजार रूपये जमा झाले. ते पोस्टात जमा होत गेले. या ४,००० रूपयांवरोवर १२,५०० रू. च्या कर्जाऊ भांडवलावर ठाणे येथील चरई भागातल्या धोबी आळी येथील १२,००० वार जमीन खरेदी केली. १९४७ साली हा करार झाला. कार्यकर्त्या च्या पदरात स्वतःची जागा पडली. परंतु त्या जागेत संस्थेचा कारभार

चालवणे तितकेसे सोपे नव्हते. हयाच जागेत व्यायामशाळा आल्यावर कार्यकर्त्यांची खरी कसोटी लागली. कारण हया जागेचा अर्धा भाग विहीर व दलदलीने व्यापलेला होता. तर उरलेल्या अर्ध्या भागात मोठे मोठे खडक व टेकडया कार्यकर्त्याच्या उमेदीला आव्हान देत होत्या. पण या जिददी कायकर्त्यांनी याही अडचणींवर मात केली. त्यांनी ढोर मेहनत करून खडक फोडण्यास, टेकड्या नष्ट करण्यास आणि दलदलीच्या भागात भराव टाकण्यास सुरुवात केली. स्वतःची नोकरी सांभाळून हा कामगार वर्ग एकाच ध्येयाने प्रेरीत होऊन अक्षरशः दिवस-रात्र राबत होता. यात पुरूषांच्या बरोबरीनेच स्त्रियांनीही जोमाने सहभागी झाल्या होत्या. थोडक्यात हयातील प्रत्येक कार्यकर्त्यांचे संपूर्ण कुटुंबच हया जागेचे स्वरूप पालटून टाकण्यासाठी अहोरात्र झटत होते. आजही संस्थेच्या कार्यालयात असलेल्या कार्यकर्त्याच्या नावांच्या यादीत अनेक महिलांच्या नावांचाही समावेश असलेला दिसून येईल. अर्ध शतकापूर्वी) बहुजन समाजातल्या स्त्रीयांनी घराबाहेर पडून एखादया संस्थेसाठी कोणताही मोबदला न घेता नेटाने काम करणे ही गोष्ट खरोखरच क्रांतिकारी स्वरूपाची होती. पन्नासच्या दशकात या कष्टातून शेवटी ८०x४० फुटांचे क्रिडांगण तयार झाले. त्यानंतर त्याच जागेवर एका वाजूला व्यायामशाळेसाठी १५x४० फुटांची पत्र्याची शेड बांधण्यात आली. तेथे नित्याचे उपक्रम सुरू झाले. व्यायाम साहित्य आले. मैदानी खेळांवर अधिक भर देण्यात आला. अजूनही एक अडचण होतीच. संस्थेच्या जागेतच पूर्वी आक्रमण करून बांधण्यात आलेला एक म्हशींचा गोठा होता तो तेथून हलविण्यासाठी कार्यकर्त्यांना कायदेशीर लढा दयावा लागला व शेवटी १९५० साली हि अडचण देखील दूर झाली.

**<u>दुसरा टप्पा (१९५१ ते १९६२)</u>**

१९५१ साली मावळी मेळ्याचे रूपांतर हे श्री'मावळी मंडळ संस्थेत झाले. हिचे चॅरीटेबलें ट्रस्ट कायद्यानुसार नोंदणी करण्यात आली.

संस्था म्हटली की त्या संस्थेची वास्तु असावी म्हणजे त्या संस्थेच्या कार्याला एक निश्चित दिशा मिळते. श्री मावळी मंडळाची वास्तु अनेक अडचणींना तोंड देत तीन वेळा स्थलांतरीत झाल्यानंतर सध्याच्या जागी स्थिर झाली. १९५१ साली एक पागी इमारत उभी राहिली. तरी संस्थेची इतर प्रगती होण्यासाठी आर्थिक बळ असणे आवश्यक होते. परंतु सभासद मंडळींनी केलेल्या ठरावाप्रमाणे कुणाकडूनही देणगी घ्यायची नाही असे असल्यामुळे कर्ज फेडण्यासाठी पैसा उभा करायचा कसा हा मोठा प्रश्न सर्व सभासदांपुढे उभा राहिला. १९५४-५५ मधील रु. १६,००० किंमत आताच्या पिढीला कळणार नाही कारण त्याकाळी माणसाला पगारच ५० ते १०० रू. मिळत होता. संस्थेला १२,००० रू. कर्ज फेडणं अशक्य झाले. मग भाव वाढलेली थोडी जागा विकण्याचा १९५८ मध्ये संस्थेने निर्णय घेतला. त्यातूनच मैदानात तलावाभोवती असणाऱ्या पालेभाज्या, नारळ आदी गोष्टी सभासद विकून संस्थेसाठी निधी उभारू लागले. तसेच तलावात मुलांना पोहावयास शिकवून त्यांच्याकडून फी रुपी निधी गोळा होऊ लागला. त्याकाळी बँका किंवा पतपेढी वगैरेंकडून संस्थेला कर्ज मिळत जसे म्हणून सर्व सभासदांनी विचाराअंती सावकाराकडून हुंडी घेऊन संस्था उभारण्यास सुरुवात केली. या मैदानासाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी संस्थेने १९५२ साली नाटकांच्यो माध्यम वापरले. त्या सर्व गोष्टींतून १९५६ सालापर्यंत संस्थेला कर्जमुक्त केले. कर्ज फेडण्यासाठी फेडण्यासाठी संस्थेला ११ वर्षे लागली.

संस्थेच्या स्थापनेपासून शिवजयंती उत्सव साजरा होत असे. १९५१ साली शिवजयंती उत्सवानिमित्त हुतुतुच्या स्पर्धा सुरु केल्या. त्यात ठाणे मुंबईचे नामवंत खेळाडू व संघांनी भाग घेऊन जनतेला आपले क्रिडानैपुण्य दाखवीत या स्पर्धा आजपर्यंत ७१ वर्ष सातत्याने चालू आहेत. १९५१ च्या शिवजयंती उत्सवात स्वतः हुन यशवंतराव चव्हाणांनी भेट दिली.

१९५६ साली दोन पागी इमारत उभी राहिली. संस्थेचा कारभार हळुहळु वाढू लागला. या काळात संस्थेकडे ८,५०० वारच जागा उरली. मासिक वर्गणी शिवाय संस्थेकडे दुसरे उत्पन्नाचे माध्यम नव्हते. त्यातुन संस्थेचे वार्षिक कार्यक्रम व दैनंदिन कारभार चालवणे फारच कठीण होते. १९५७ ते १९६२ हा मावळी मंडळाच्या दृष्टीने खऱ्या अर्थान आर्थिक खडतरतेचा कालावधी होता.

## तिसरा टप्पा (१९६२ ते २०००)

१९६२ सालापासून मात्र नव्या पिढीने हळूहळू मंडळाच्या दैनंदिन कारभारात लक्ष घालण्यास सुरूवात केली. हि पिढी तोपर्यंत मंडळाच्या क्रिडा विभाग सांभाळीत होती. राज्यभरातील हुतुतू मैदाने गाजवीत होती. व्यायामशाळा सांभाळीत होती. मंडळाच्या कार्यालयीन कामात त्यांनी कधी ढवळाढवळ केली नव्हती. पण आता त्यांच्या आधीची पिढी वयोमानानुसार हळु हळु थकत चालली होती. संस्थेचा डोलारा सांभाळण्यासाठी आता नव्या दमाचा आधार मिळणे गरजेचे होत आहे. ती काळाची गरज होती. हि गरज पूर्ण केली ती सुधीर यादव (दादा). त्यांना जुन्या पिढीतील खंदे कार्यकर्ते चिमाजी उतेकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. तोपर्यंत हुतुतू व कवडडी क्षेत्रात दादांच्या नावाचा प्रचंड दबदबा निर्माण झाला होता. ते एक अष्टपैलू खेळाडू व उत्तम संघनायक होते. त्याच्या नेतृत्वाखाली श्री मावळी मंडळाच्या संघाने अनेक स्पर्धात अजिंक्यपदे मिळवली होती.

अशा या कुशल संघनायकाची १९६६ साली प्रथम कार्यकारीणी सदस्य म्हणून निवड झाली. त्यांनी मग कमालीच्या वेगाने पावले टाकली. धाडसाने नवनवे उपक्रम राबविले. अनेक नव्या कल्पनांना कृतीची जोड देऊन अविश्रांत परिश्रम घेतले. त्यांना त्यांच्यासारखेच निःस्पृह व नेकीचे साथीदार मिळाले होते. त्यांनी मंडळाच्या कार्यपध्दतीत अमूलाग्र बदल घडवून आणला.

सुधीर यादव व त्यांच्या सहकारयांनी मंडळाचे संस्थापक शंकर नारायण यादव यांच्याकडून ५० रू. घेऊन १९६३ सालच्या गुढीपाडव्याला ठाण्याच्या प्रभात थिएटरमध्ये 'गंगेत घोड न्हालं 'हा राजा परांजपे दिग्दर्शित गाजलेला मराठी चित्रपट दाखविला. त्यातून संस्थेला उत्पन्न मिळवून दिले. तसेच शिवजयंती उत्सवात होणा या कबडडी स्पर्धेच्या वेळी प्रेक्षकांकडून प्रत्येकी १ आणा घेऊन त्यांना क्रिडा नगरीत प्रवेश देण्यात येऊ लागला. हि कल्पनाही फलदायी ठरली. मंडळाच्या जागेत तलाव होता. त्यात आजूचाजूची मुले पोहायला येत. येथे मग पोहण्याचे वर्ग घेण्यात येऊ लागले. प्रत्येक विदयार्थ्याकडून १० पैसे फि घेतली जाऊ लागली तसेच मंडळाच्या जागेतील नारळ शेवग्याच्या शेंगा, आळू आदींच्या विक्रीतून वर्षाकाठी दोन सव्वादोनशे रूपये मिळू लागले. अशा प्रकारे सुधीर यादव व त्यांच्या सहका यांनी अवघ्या वर्षभरात संस्थेला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून दिले.

१९६७ साली जागेचा मैदान म्हणून वापर करण्यासाठी ठाणे जिल्हाधिकायांनी मान्यता दिल्यामुळे ठाण्याच्या तहसिलदारांकडे १,३०० रूपयांचा भरणा त्वरीत करणे आवश्यक होते. पुन्हा ही पिढी कामाला लागली. ठाण्यातील न्यू इंग्लिश स्कूलच्या जागेत तेंव्हा गाजत असलेल्या' काचेचा चंद' या नाटकाचा प्रयोग लावून मंडळाने चक्क १०,००० रूपये नफा मिळविला

१९६७ साली जिल्हाधिकारी ठाणे यांनी संस्थेच्या जागेस मैदान म्हणून वापरण्यास मान्यता दिली. तशी सनद संस्थेस मिळाली. पुढील तरूण खेळाडू आणि कार्यकर्त्यांची फळी तयार झाली. तरूण मंडळी खेळात मैदान गाजवून स्वतःबरोबर संस्थेचा नावलौकिक वाढवित होता. तसेच संस्थेची आर्थिक बाजू भक्कम करण्यासाठी धडपडत होती.

संस्थेचे मूळ संस्थापक सभासद यांनी अतिशय मेहनतीने प्रामाणिकपणे उभारलेला डोलारा हा यापुढे देखील त्याच प्रामाणिकपणे सचोटीपणाने सांभाळून संस्थेची प्रगती करणे आवश्यक होते म्हणून त्यासाठी योग्य पदाधिकाऱ्यांची

निवड करायचे ठरविले. १९६२ ते १९६८ या सहा वर्षात तरूण पिढीने संस्थेच्या उत्कर्षासाठी घेतलेले कष्टे व दाखविलेली तळमळ जुन्या पिढीने पाहिली. त्यामुळे त्यांना त्या नवीन पिढीबददल विश्वास वाटला व त्यांनी नवीन पिढीकडे संस्थेचा कारभार सोपविला आणि स्वतः फक्त मार्गदर्शक म्हणून काम पाहू लागले .

नवीन पिढीमध्ये मावळी मंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी अवघ्या २६ वर्षाच्या सुधीर यादव यांच्याकडे आली. हा तरूण अध्यक्ष झाला. चिटणीस म्हणून सुरेश कमळाकर म्हात्रे यांची निवड झाली. इतर तरूण कार्य कारीणी सदस्यामध्ये जुन्या पिढीपैकी ना. आ. कांबळे, ना. वा. चौधरी आणि चि.म. उतेकर ही मंडळी होती. अशा रीतीने नवीन पिढीचा जोश आणि जुन्या पिढीचे मार्गदर्शन या संगमाने नव्याने संस्थेचा कारभार सुरू झाला. मागील सहा वर्षाच्या अनुभवाने व प्रत्येक वेळी मिळत गेलेल्या यशाने संस्थेत नवचैतन्य निर्माण झाले. या पिढीने ठरावच करून टाकला की आपल्या पिढीला संस्थेच्या माध्यमातून जे मिळाले नाही ते सर्व पुढील पिढीला मिळवून दयायचे.

२४ मार्च १९७४ ला गुढीपाडव्याच्या शुभमुहुर्तावर नवीन संकल्पित व्यायामशाळेच्या व सभागृहाच्या वास्तूचा भूमीपूजन सोहळा झाला. हया इमारत बांधकामाकरीता ठाणे नगरपालिकेकडून ६५,००० रूपये, शासनाकडून ७८,००० रूपये अनुदान मिळाले. हया इमारत बांधकामाच्यावेळी नामांकित कम्युनिस्ट पार्टीचे प्रमुख कॉ. कृष्णा खोपकर हे मंडळाच्या मागे खंबीरपणे उभे राहिले त्यांच्या आणि रेमंड वुल मिलचे मालक कै. गोपाळसेठ सिंघानिया हयांच्या मदतीने १,३८,००० रूपये एवढया रकमेचा पहिला मजल्याचा स्लॅब घालण्यात आला.

हया इमारतीच्या उभारणीसाठी समाजातील ज्या महनीय व्यक्तींचे सहाय्य मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले, त्यातील काही नावे म्हणजे रेमंड वुलन मिल्सचे तत्कालीन एक्झिक्युटीव डायरेक्टर श्रीमान बाळकृष्णजी केडीया, मालक सर्वश्री विजयपथ व गोपालपथ सिंघानिया, जे. के. फाईल्सचे संजीव शेट्टी साहेब, रूपचंद हजारीमल, कॉम्रेड कृष्णा खोपकर, विमलताई रांगणेकर, के. डी. शहा, अकबर अल्ली चौहान, अमृतलाल व छगनलाल मिस्त्री, चौधरी साहेब, वसंतराव महाडीक, रावसाहेब हनुमानबक्ष मुंदरा, शामजीभाई.

१,८२,००० रूपये कर्ज काढून उर्वरीत रक्कम सभासदांनी वर्गणीदवारे व विविध कार्यक्रमादवारे जमविली.

संस्थेची ओळखच मुळी खेळातून निर्माण झाली असल्याने संस्थेने ठाण्यात अद्यावत अशा व्यायामशाळेची निर्मिती केली. प्रारंभी पत्र्याचा शेडमध्ये उभारलेली व्यायामशाळा १९७७ साली संस्थेच्या नवीन इमारतीत अद्यावत अशा उपकरणांनी सुसज्ज अशी कार्यरत झाली.व्यायामशाळेत जोर बैठका मुकदल वारवेल कुस्तीचा आखाडा सुरु केला. मैदानावर लाठीकाठी हुतुतु हे खेळ सुरु झाले.

हया इमारतीसाठी एकूण खर्च ५,४०,००० रूपये एवढा झाला होता. १९८२ साली पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सभागृहात सत्यनारायणाची पुजा घालून सभागृह सांस्कृतिक कार्यक्रमाला देण्यासाठी सुरूवात करण्यात आली. सर्वसामान्यांना परवडेल अशा अत्यल्प देणगीमध्ये ते वापरास दिले जाऊ लागले. त्या उत्पन्नामुळेच पुढील तीन वर्षात संस्थेच्या डोक्यावर असलेले १,८२,००० रूपयांचे कर्ज १९८६ पर्यंत फेडण्यात आले .

संस्थेच्या परिसरातील मुलांना हॉकी, फुटबॉल, व्हॉलीवॉल, डॉजबॉल तसेच अथेलेटीक्सचे शास्त्रशुध्द शिक्षण देण्यासाठी संस्थेने १९८६ सालापासून क्रिडाप्रशिक्षण वर्ग सुरु केले आहेत. या विभागात ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुले मुली प्रशिक्षण घेत असतात. रोज संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळेत हे वर्ग सुरू असतात. या वर्गाचा लाभ

घेवून आज अनेक मुले शारीरीकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या सुदृढ झालेली आहेत. अंदाजे ६० ते ६५ मुलांचा दमा अस्थमा कायमस्वरूपी बरा  झाला आहे.

अश्याप्रकारे संस्थेचे विविध उपक्रम चालू असताना आजूबाजूच्या परिसरातील बिल्डर लॉबीचे अतिक्रमण संस्थेच्या जागेवर होऊ पहात होते कारण ठाण्यासारख्या शहरात मध्यवर्ती ठिकाणी असलेली एवढी मोठी जागा पटकन कोणाच्याही नजरेत भरत होती. ही जागा मिळविण्यासाठी बिल्डर लॉबीने साम दाम दंड ह्या सर्व प्रकारचा अवलंब केला. परंतु संस्थेच्या निस्पृह खंबीर कार्यकत्यांनी ही सर्व आक्रमणे एकजूटीने परतवून लावली. कार्य कर्त्यांना वेळोवेळी आर्थिक अमिषे दाखविण्यात आली त्यांच्यावर वैयक्तिक हल्ले पण झाले. केवळ सामाजिक बांधिलकी म्हणून राष्ट्राची संपत्ती असलेल्या कर्तव्याची जाण ठेवून ह्या जागेचे संरक्षण केले.

ह्या संस्थेच्या उभारणीत दादांबरोबर सुरेश म्हात्रे, जोसेफ फर्नांडिस, प्रभाकर सुर्वे, कृष्णा डोंगरे, जुगलकिशोर मुंदडा ,सुधाकर मोरे, पॅट्रिक फर्नांडिस, रवींद्र आंग्रे, बालकिशन मुंदडा, केशव मुकणे, रमण गोरे, हेमचंद्र ओवळेकर, तुकाराम जाधव, मधुकर घाग, रिचर्ड डिसिल्वा, अशोक वीरकर, विजय देवळेकर ह्यंनी मोलाचा हातभार लावला.

**चोथा टप्पा (२००० ते २०२४)**

एखादी संस्था एवढ्यावरच समाधान मानून स्वस्थ बसली असती परंतु हया मातीचा गुणच वेगळा. लगेचच त्या मावळ्यांना पुढल आव्हान खुणावू लागलं ते म्हणजे संस्थेची स्वत:ची इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्याचं. पुन्हा सगळेच कंबर कसून कामाला लागले.

पुन्हा सुरू झाली धडपड हया मावळयांची. एव्हाना हे मावळे पन्नाशीच्या पुढे गेले होते.  पण उत्साह असा दांडगा की बघणा-याने तोंडात बोटे घालावीत. पुन्हा भेटीगाठी, सरकार दरबारची कामं हे सगळ सुरू झालं. इसवी सन २००० मध्ये शाळेचा पायाभरणी समारंभ मोठ्या थाटामाटात साजरा झाला. सगळेच मोठे उत्साहात होते. पण काही महिन्यांच्या आतच नियतीनं सगळयांचा कर्णधार सुधीर यादव हयाला अकाली ओढून नेलं. काही दिवस सगळेच सुन्न झाले. पण डगमगतील तर ते मावळे कुठले? सगळेच पुन्हा झटून कामाला लागले आपल्या कर्णधार दादांच स्वप्न पूर्ण करण्यासाठी.

काळाची गरज ओळखून व्यायामशाळेचे २००१ साली नूतनीकरण करून अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज करण्यात आली. त्यासाठी एकूण ९,00,000 रूपये खर्च आला. तसेच महिला विभाग चालु करून त्याकरीता रू. ४,00,000 रूपये खर्च करण्यात आला. ही व्यायामशाळा आज संपूर्ण ठाणे शहरात कौतुक आणि चर्चेचा विषय बनलेली आहे. पाश्चिमात्य पदधतीच्या सर्व उपकरणांनी परिपूर्ण अशा व्यायामशाळेची मासिक फी फक्त ५०० रूपये असून ठाण्यातील इतर व्यायाम शाळेच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. हया व्यायाम शाळेचा अंदाजे ८५० ते ९०० व्यायामपटटू पुरूष विभागात आणि अंदाजे १५० ते २०० महिला दररोज लाभ घेतात.

लवकरच म्हणजे सन २००५ मध्ये संस्थेने स्वतः च्या शाळेचे स्वप्न पूर्ण झालं. त्यांनीही हे सिध्द केलं की आम्हीही काही कच्च्या गुरुचे चेले नाहीत.

क्रिडाक्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवणा-या हया संस्थेची सोनपावलं आता पडत होती एका नवीन आव्हानात्मक क्षेत्रात शैक्षणिक क्षेत्रात. हया कामी सुध्दा संस्थेला समाजातील महनीय व्यक्तींनी सढळ हस्ते मदत केली, मोलाचे मार्गदर्शन केले. त्यातील काही महनीय व्यक्ती म्हणजे अशोक टिळक सर, बोर्डे मॅडम, खा. प्रकाश परांजपे, विधान परिषद उपसभापती वसंतराव डावखरे साहेब, वि. ह. भूमकर सर.

मंडळाच्या शाळेचे वैशिष्ट्य असे की सुरूवातीपासूनच ह्या शाळेने अभ्यासाबरोबरच क्रिडेलाही महत्त्व दिले आहे. म्हणूनच शाळेच्या चिन्हामध्ये पुस्तक आणि ज्ञानज्योती सोबतच फुटबॉल ही दाखविण्यात आला आहे.

साल २००५ च्या जून महिन्यापासून संस्थेच्या आवारात शिशूवर्गाचा किलबिलाटही ऐकू येऊ लागला. इवले - इवले लकाकणारे डोळे हे अफाट विश्व आपल्यात सामावून घेऊ लागले. शाळेच्या प्रवासात संस्थेला अगदी सुरूवातीच्या काळात साथ लाभली ती ए. के. जोशी हायस्कूल, ग्राममंगल संस्था यांची. संस्थेच्या संस्कारांप्रमाणे संस्थेचे कार्यकर्तेही शाळेतील शिक्षकांसोबत डहाणू येथिल ऐने गावात संस्थाचालक असूनही स्वत:चा काम धंदा बाजूला सारून पंधरा दिवस प्रशिक्षणासाठी स्वत: हजर राहिले.

दिनांक २८ मे २००८ ला स्वा. सावरकर सेवा संस्था हयांनी संस्थात्मक कार्यक्रमात उत्तम नमुना असलेली, सामाजिक व क्रीडा क्षेत्रात असलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचा गौरव केला.

साल २०१२ पासून शाळेतील इतर तासिकांसोबतच खेळासाठीची विशेष तासिका (S.P.C.) सुरू करण्यात आली. हयात प्रत्येक खेळाचे स्पेशल प्रशिक्षक रोज सकाळी शाळेतील मुलांचा सराव घेतात. त्याचेच फळ म्हणून अल्पावधीतच श्री मावळी मंडळ हायस्कूलच्या मुलांनी D.S.O., राज्य व राष्ट्रीय क्रिडास्पर्धांमध्ये आपले स्थान निर्माण केले. खो-खो व कबड्डी सारख्या सांघिक खेळांमधूनही जिल्हा तसेच राज्यस्तरावर अनेक पारितोषिके पटकावली. शाळेच्या शिशूवर्गापासूनच मुलांची लवचिकता लक्षात घेऊन त्यांना जिम्नॅस्टीकसचे देखील शास्त्रशुध्द प्रशिक्षण दिले जाते.

पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना अनुभवाधारीत शिक्षण देण्याच्या उद्देशाने विविध फ्रकारच्या प्रकल्प भेटींचा (Site Visits) चा अनुभव दिला जातो. शाळेतील विद्यार्थी होमीभाभा, स्कॉलरशीप व ऑलिंपियाड सारख्या परीक्षांमधून घवघवीत यश संपादन करीत आहेत. आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनात (उर्जा) विद्यार्थ्यांनी अतिशय कल्पक असा प्रकल्प सादर केला होता. आज संस्थेच्या शाळेलाही १९ वर्षे पूर्ण झाली आहेत. शाळेत आजमितीस १२०० हून अधिक विदयार्थी शिक्षण घेत आहेत. २०१७ मध्ये शाळेची पहिली S.S.C. ची पहिली बॅच १००% रिझल्टसह बाहेर पडली व गेली ८ वर्षे शाळेचा दहावीचा निकाल सातत्याने १००% लागत आहे.

प्रत्यक्ष मावळी मंडळाच्या शाळेतही शासनातर्फे विज्ञान प्रदर्शने भरविण्यात आली आहेत. शहरातील इतर शाळा ही मावळी मंडळ संस्थेच्या मैदानाचा आपला क्रिडा महोत्सव साजरा करण्यासाठी म्हणून उपयोग करून घेत असतात. कित्येक वर्षे ठाणे महानगरपालिकेच्या शाळांचा क्रिडामहोत्सव हा संस्थेच्या मैदानात साजरा झालेला आहे. इतकेच नव्हे तर जिल्हाधिकारी कार्यालय असो किंवा वनविभाग असो हे देखील आपल्या अधिका-यांचा कर्मचा-यांचा क्रिडास्पर्धांसाठी मावळी मंडळाच्या मैदानालाच प्रथम पसंती देत असतात.

साल २०२२ मध्ये ठाणे शहरात साजरा करण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव ह्या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन श्री मावळी मंडळ ह्या संस्थेत करण्यात आले होते आणि विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ह्या कार्यक्रमात सर्वोत्कृष्ट आयोजनाचे बक्षीस हे श्री मावळी मंडळ ह्या संस्थेस मिळाले.

संस्थेने आपल्या उपक्रमात जिम्नॅस्टिकस, स्केटिंग, डान्स हयांचे प्रशिक्षण ह्या कालावधीत चालू केले.

संस्था गेली १९ वर्षे सातत्याने यशस्वीपणे आंतरशालेय क्रिडा स्पर्धा घेत आहे. सदरच्या स्पर्धेतून ठाण्यातील हजार ते दीड हजार विद्यार्थी आपले कसब पणाला लावीत असतात. संस्था गेली ३३ वर्षे जिल्हा स्तरीय व

अंतर्गत शरीर सौष्ठव "श्री मावळी मंडळ श्री " स्पर्धा आयोजित करीत आहे.  त्यामध्ये नामवंत व्यायामपट्टू सहभागी होत असतात . तसेच,  संस्था गेली ७१ वर्षे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करीत आहे.  स्थेचे लहान थोर कार्यकर्ते (शब्दश: ५-६ वर्षांच्या लहानग्यांपासून ते ८०-८५वर्षांचे कार्यकर्तेही) स्वकष्टाने अंगमेहनतीने ह्या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी झटत असतात. ह्याला अपवाद होता कोरोना काळाचा. संस्थेने सामाजिक बांधिलकी सांभाळत हया सर्व स्पर्धांसाठी येणारा खर्च समाजासाठी वापरण्याचे ठरविले व संस्थेने मुख्यमंत्री निधीसाठी ठाण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात तत्कालिन जिल्हाधिकारी श्री राजेश नार्वेकर यांना रू. दहा लाखाचा धनादेश सुपूर्द केला. संस्थेने आपल्या स्थापनेपासून आजवर समाजातील होतकरू व गरीब खेळाडूंच्या उत्कर्षासाठी आपल्या मदतीचा हात पुढे केलेला आहे. व ही परंपरा १-२ वर्षांची नव्हे तर गेल्या १०० वर्षांची आहे.